महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ ०८ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १०५ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


लक्षवेधी



### मुरबाड, शहापूर, भिवंडी तालुक्यात

## परतीच्या पावसाने शेतीचे नुकसान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - परतीच्या मुसळधार पावसाने ठाणे जिल्ह्यातील मुरबाड, शहापूर, भिवंडी पट्ट्यातील शेतकऱ्यांचे हाता तोंडाशी आलेले भातपीक भुईसपाट केले आहे. मुसळधार पावसामुळे शेतांमध्ये गुडघाभर पाणी आहे. त्यात भातपीके शेतात पाऊस, वाऱ्याने कोलमडली आहेत. त्यामुळे भाताच्या तुऱ्यामधील दाणा, खोडाचा (पोटरी) नवजात दाणा खराब होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

गेल्या पाच महिन्याच्या काळात भात शेतीला पोषक असा पाऊस ठाणे जिल्ह्यात पडला. गेल्या दोन महिन्याच्या काळात भात पिकावर बगळ्या, खैऱ्या रोग पडले. मुसळधार पावसामुळे आणि शेतकऱ्यांनी दोन महिन्याच्या कालावधीत भात पिकावर जंतुनाशक, कीटकनाशक फवारणी केल्याने पीकावरील हे रोग उडून गेले आहेत. सोन्यासारखे पिकलेले भात पीक ताब्यात येण्यासाठी गणपतीनंतर पाऊस कमी होणे आवश्यक होता. परंतु, आता दिवाळी आली तरी पावसाचे प्रमाण कमी होत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आहे.

शेतामधील पावसाचे तुंबलेले पाणी असल्याने शेतांमध्ये चिखल आहे. गुडघाभर पाणी आहे. या पाण्यामुळे शेतात वारा, पावसामुळे कोसळलेले भात खराब होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. तसेच, अनेक भात पिके ही येणाऱ्या १५ ते २० दिवसांनी कापणीला तयार होत आहेत. शेत कोरडे असेल तर कापलेली भात पिके शेतात पसरून ती वाळविणे शक्य होते. यामुळे कापलेले भात पीक शेताच्या बांधावर, माळरानावर नेण्याची मजुरांची वाहतूक कमी होते. कमी वेळेत जास्त कापणीचे काम होते. पण, आता पाऊस थांबला नाही आणि शेतामधील तुंबलेल्या पाण्याचे प्रमाण कमी झाले नाहीतर कापणी करताना शेतामधील भात पीक माळरानावर वाळविण्यासाठी न्यावे लागेल. काही शेतकरी यंत्राच्या साहाय्याने भात पीक कापतात. त्या सयंत्राची चाके शेतामधील चिखलात रुतण्याची भीती यांत्रिक पध्दतीने भात कापणाऱ्या शेतकऱ्यांना वाटत आहे.

ठाणे जिल्ह्यात चालूवर्षी नियमित भात लागवडीचे आणि सगुणा भात लागवड तंत्राने केलेली भात पिके जोमाने आली आहेत. अनेक भात पिके आता तुऱ्यात (लोंगवा) दाणा तयार झाल्याने कापणीला आली आहेत. ही भात पिके कापणीनंतर घराजवळ ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना खळी करायची आहेत. पाऊस थांबत नसल्याने खळी करण्यात शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. तयार भाती पिके वेळेत कापली नाहीतर तुऱ्यातील दाणा गळून पडण्याची भीती आहे. मुसळधार पाऊस आणि वाऱ्यामुळे अशा अनेक बाजुने ठाणे जिल्ह्यातील शेतकरी चिंतेत आहे.



### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते...

# आज नवी मुंबई विमानतळाचे उद्‌घाटन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्‌घाटन आज (ता. ८) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. उलवे येथे सुमारे १,१६० हेक्टरवर उभारण्यात आलेले देशातील पहिले ग्रीन फिल्ड विमानतळ सेवेत येणार आहे. मोदींच्या हस्ते या विमानतळाच्या उद्‌घाटनानंतर भव्य सोहळा होणार आहे. या सोहळ्यामध्ये लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्याची घोषणा मोदींकडून होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. हा सोहळा अधिक नेत्रदीपक होण्यासाठी भाजप आणि शिवसेना महायुतीने कंबर कसली आहे. सुमारे ५० हजार नागरिक या कार्यक्रमाला येण्याची शक्यता आहे. त्या दिशेने पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी यांनी जोर लावला आहे, तर नवी मुंबई परिसरातून ऐरोलीचे आमदार आणि वनमंत्री गणेश नाईक आणि बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्यामार्फत मोठ्या प्रमाणात गर्दी केली जाणार आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात होणाऱ्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंद, अजित पवार यांच्यासहित डझनभर मंत्री आणि केंद्रीय मंत्री उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे या कार्यक्रमाच्या निमित्ताने महायुतीतर्फे शक्तिप्रदर्शन होणार आहे.

“ बहुप्रतीक्षित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे अखेर बुधवारी (दि. ८) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्धाटन होणार आहे. हा अत्याधुनिक कार्यक्रम उद्या दुपारी सुमारे २.४० दरम्यान पार पडणार आहे. महाराष्ट्रासाठी हा एक महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प मानला जात आहे. पंतप्रधानांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी व्यापक वाहतूक निर्बंध लागू केले आहेत. हे निर्बंध ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत लागू राहतील. सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी संपूर्ण शहरात पोलिसांचा जोरदार बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### ■ मोठ्या वाहनांवर बंदी

वाहतूक विभागाच्या उपायुक्तांनी जारी केलेल्या आदेशानुसार, सर्व प्रकारच्या मोठ्या मालवाहतूक वाहनांना ८ ऑक्टोबर रोजी नवी मुंबईत प्रवेश, प्रवास किंवा पार्किंग करण्यास पूर्णपणे बंदी असेल. मुंबईकडून येणाऱ्या वाहनांना अटल सेतूपासून पुढे प्रवेश दिला जाणार नाही. वाशी आणि ऐरोली टोल नाक्यांवर मालवाहतूक वाहनांना थांबवण्यात येईल. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी आणि पंतप्रधानांच्या सुरक्षेसाठी विशेष मार्ग आणि डायवर्जन योजना आखण्यात आल्या आहेत.

### ■ पोलिस फौज तैनात

मुख्य रस्त्यांवर आणि विमानतळ परिसरात मोठ्या प्रमाणावर पोलिस फौज तैनात केली जाणार आहे. अधिकाऱ्यांना वाहतूक नियंत्रण आणि सुरक्षेवर सतत लक्ष ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. उद्‌घाटन समारंभासाठी येणाऱ्या खासगी बसेस व पाहुण्यांसाठी विशेष पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

## ठाणे जिल्हा परिषद सीईओ रोहन घुगे यांची जळगावच्या जिल्हाधिकारी पदी बदली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी शिक्षण आणि प्रशासन क्षेत्रात केलेल्या नाविन्यपूर्ण कामगिरीची दखल घेत त्यांची जळगाव जिल्हाधिकारी पदी बदली करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. शाळांमधील गुणवत्ता वाढविण्यासाठी 'दिशा' उपक्रम, शाळांचे डिजिटायझेशन, मुख्यमंत्री १०० दिवस कृती कार्यक्रमांतर्गत राबविलेले उपक्रम आणि प्रशासकीय कामकाजातील आमूलाग्र बदल या माध्यमातून घुगे यांनी ठाणे जिल्हा परिषदेला राज्यात प्रथम क्रमांक मिळवून दिला होता.

ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी पदी रोहन घुगे १९ जून २०२४ मध्ये रुजू झाले होते. त्यानंतर, त्यांनी ठाणे जिल्हा



परिषदेतील प्रशासकीय कामकाज पारदर्शक पद्धतीने आणि गतिमान करण्यावर भर दिला. तसेच जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी, स्पर्धा परिक्षेसाठी हे विद्यार्थी तयार व्हावे यासाठी त्यांनी कृत्रीम बुद्धिमत्ता (एआय) चा वापर करुन दिशा प्रकल्प हाती घेतला होता. याप्रकल्पाची राज्यभरातून कौतूक करण्यात आले.

ग्रामीण भागातील शिक्षण डिजिटलायझेशण करणे, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गुणवत्ता सुधारण्यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यासह, ग्रामीण भागातील आरोग्य सेवेला बळकटीकरण करण्याचे काम केले. तसेच स्वातंत्र्यापासून जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील दापूरमाळ या आदिवासी वाडीवरील आदिवासींच्या समस्या जाणून घेण्यासाठी वाडीवर दाखल झाले. तेथील रस्ते, शाळा यासह घरकुलांचे प्रश्न मार्गी लावले. तसेच रस्त्याच्या कामाचा नारळ देखील स्वातंत्र्य दिनी वाढवत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. त्यांनी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कामांच्या पोचपावती म्हणून रोहन घुगे यांना जळगाव जिल्हाधिकारी पदी बढती मिळाली असल्याचे दिसून येत आहे.

ग्रामीण भागातील शिक्षण डिजिटलायझेशण करणे, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील गुणवत्ता सुधारण्यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यासह, ग्रामीण भागातील आरोग्य सेवेला बळकटीकरण करण्याचे काम केले. तसेच स्वातंत्र्यापासून जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील दापूरमाळ या आदिवासी वाडीवरील आदिवासींच्या समस्या जाणून घेण्यासाठी वाडीवर दाखल झाले. तेथील रस्ते, शाळा यासह घरकुलांचे प्रश्न मार्गी लावले. तसेच रस्त्याच्या कामाचा नारळ देखील स्वातंत्र्य दिनी वाढवत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. त्यांनी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कामांच्या पोचपावती म्हणून रोहन घुगे यांना जळगाव जिल्हाधिकारी पदी बढती मिळाली असल्याचे दिसून येत आहे.



# अंबरनाथमध्ये महिलाराज !

- ■ आज होणार महिला प्रभाग आरक्षणाची सोडत
- ■ नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. ७** : बदलापूरपाठोपाठ अंबरनाथ नगरपालिकेच्या नगराध्यक्ष होण्याचा मान महिलांना मिळणार आहे. मुंबई येथे मंत्रालयात सोमवारी (ता. ६) राज्यातील नगरपालिकांच्या अध्यक्षपदासाठी आरक्षण जाहीर करण्यात आले असून, अंबरनाथचे नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षित ठेवले आहे. ही घोषणा शहरात मोठ्या उत्साहासह स्वागत केली जात आहे.

२०१९ मध्ये संपुष्टात आलेल्या नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर कोरोना महामारी आणि इतर कारणांमुळे निवडणुका होऊ शकल्या नव्हत्या; मात्र आता प्रशासनाने निवडणुकीच्या रणधुमाळीस वेग दिला असून, आगामी काळात अंबरनाथ नगराध्यक्षपदासाठी सर्वसाधारण महिला गटातून निवड होणार आहे. यामुळे महिलाराज येणार आहे.

महिला प्रभाग आरक्षणाची सोडत बुधवारी (ता. ८) पालिका मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. त्यानंतर ९ ऑक्टोबरला संबंधित आरक्षण जाहीर होणार आहे. तसेच ९ ते १४ ऑक्टोबरदरम्यान हरकती व सूचना सादर करण्याची प्रक्रिया पार पडणार आहे. या तारखांपर्यंत इच्छुक उमेदवारांनी आपल्या हरकती नगरपालिकेत सादर कराव्यात. अंबरनाथमध्ये सुमारे सहा वर्षांपासून प्रशासकीय राजवट आहे. त्यामुळे निवडणुका केव्हा होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले होते. नगराध्यक्षपदासाठी इच्छुक उमेदवारांची जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे; मात्र नगराध्यक्षपद महिलांसाठी आरक्षित झाल्यामुळे अनेक पुरुष इच्छुकांचे स्वप्न तुटले आहे.

२०१५ मध्ये झालेल्या पालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एकूण ५७ सदस्य होते. त्यानंतर २०१९ मध्ये लोकप्रतिनिधींची मुदत संपुष्टात आली. यंदा होणाऱ्या पॅनेल पद्धतीच्या निवडणुकीत सदस्य संख्या ५९ झाली आहे. २०१५ मध्ये झालेल्या निवडणुकीत शिवसेनेच्या प्रज्ञा बनसोडे यांनी पहिले अडीच वर्षे, तर मनीषा वाळेकर यांनी पुढील अडीच वर्षे नगराध्यक्षपद सांभाळले. आता पुन्हा नगराध्यक्षपद महिलांसाठी आरक्षित झाल्याने अंबरनाथमध्ये महिलाराज कायम राहणार आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना महिला नेतृत्वाकडून प्रगतीची अपेक्षा आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या

## ठाणे शहराध्यक्षपदी मनोज प्रधान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बातमीदार/दि.7**

**ठाणे** : ठाणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या ठाणे शहर (जिल्हा) अध्यक्ष सुहास देसाई यांनी पक्षाला रामराम ठोकत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत नुकताच प्रवेश केला. शहराध्यक्षच पक्षाला सोडून गेल्याने शरद पवार गटासाठी हा मोठा धक्का मानला जात होता. असे असतानाच, आता पक्षाचा नवा अध्यक्ष कोण अशी चर्चा सुरू असतानाच, आमदार जितेंद्र आव्हाड यांचे निकटवर्तीय आणि माजी नगरसेवक असलेले मनोज प्रधान यांच्याकडे पक्षाने शहराध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तोंडावर ठाण्यात पक्ष प्रवेशाची मालिका सुरु झाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे विक्रम खामकर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नुकताच शिवसेनेत प्रवेश केला.

त्यापाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे ठाणे शहर अध्यक्ष सुहास देसाई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षात प्रवेश केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. या प्रवेशाच्या निमित्ताने अजित पवार गटाने राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना मोठा धक्का दिल्याचे बोलले जात आहे. दरम्यान, पक्षाचा नवा अध्यक्ष कोण अशी चर्चा सुरू असतानाच, राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या ठाणे शहर (जिल्हा) अध्यक्षपदी माजी नगरसेवक मनोज प्रधान यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जितेंद्र आव्हाड यांच्या मार्गदर्शनानुसार राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाच्या ठाणे जिल्हा मध्यवर्ती कार्यालयात कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. विद्यमान कार्याध्यक्ष प्रकाश पाटील यांनी अध्यक्षपदासाठी मनोज प्रधान यांचे नाव सुचविले. या बैठकीत जवळपास सर्वच कार्यकर्त्यांनी मनोज प्रधान यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. त्यानंतर प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी मुंबईत प्रधान यांच्या नावाची घोषणा केली.









# नवी मुंबई विमानतळ नामकरण लढा सुरू राहणार..

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव जाहीर होत नाही तोपर्यंत कार्यक्रमास जाणार नाही - खासदार सुरेश म्हात्रे**

**भिवंडी** : नवी मुंबई विमानतळास लोकनेते दि.बा. पाटील यांचे नांव केंद्र सरकारने आधी जाहीर करावे,जोपर्यंत विमानतळात लोकनेते दि.बा.पाटील यांचे नांव लागत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही नामकरण साठी आमचा लढा सुरू राहणार आणि उद्या होणाऱ्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थित राहणार नाही अशी सडेतोड भूमिका प्रतिक्रिया भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे यांनी दिली. नवी मुंबई विमानतळाच्या उद्घाटनासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे उद्या मुंबईत येत आहेत त्यामुळे त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी राज्य शासनाकडून सुरू आहे. विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव ते जाहीर करणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नवी मुंबई विमानतळास लोकनेते दि.बा.पाटील यांचे नाव द्यावे यासाठी खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे यांनी नुकतेच नवी मुंबई येथे आंदोलन केले होते. त्यामुळे सर्वाना औसुक्य निर्माण झाले आहे.विमानतळ नामकरण तात्काळ व्हावे यासाठी खा.म्हात्रे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपली आग्रही भूमिका मांडली होती. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक भूमिका घेऊन खासदार सुरेश (बाळमामा) म्हात्रे व त्यांच्यासोबत असलेल्या भूमिपुत्र शिष्टमंडळास नामकरणाबाबत शाश्वत केले असल्याची माहिती त्यांनी दिली. ज्या दिवशी विमानतळाचे लोकनेते दि.बा. पाटील यांचे नामकरण होईल.त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे पुष्पहार घालून स्वागत करू अशी भूमिका खासदार सुरेश म्हात्रे यांनी जाहीर केली आहे.केंद्र शासनाने तातडीने लोकनेते दि.बा. पाटील यांचे नांव विमानतळास देण्यात यावे अशी अपेक्षा खा.म्हात्रे बोलून दाखवली आहे. जोपर्यंत नामकरण होत नाही तोपर्यंत कार्यक्रमाला जाणार नसल्याची माहिती खासदार सुरेश ( बाळामामा ) म्हात्रे यांनी दिली.तसेच नामकरणासाठी लढा सुरूच राहणार असल्याचे सांगितले.



# संरक्षण दलाचा मानबिंदू

## भारतीय वायू दल

आज ८ ऑक्टोबर, दरवर्षी ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय वायुसेना दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा केला जातो. यावर्षी आपण आपला ९३ वा वायुसेना दिन साजरा करत आहोत. भारतीय वायू सेनेचे महत्व लोकांना कळावे आणि लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी हा दिवस साजरा केला जातो. भारतीय वायुसेना ही भारतीय संरक्षण दलांच्या पाच मुख्य विभागांपैकी एक असून तिच्यावर भारताच्या वायुक्षेत्राचे रक्षण करण्याची व भारतासाठी हवाई युद्ध करण्याची जबाबदारी आहे. भारतीय हवाई दल जगातल्या पहिल्या पाच उत्कृष्ट दलातील एक मानले जाते. ८ ऑक्टोबर, १९३२ रोजी भारतीय वायुसेनेची स्थापना युनायटेड किंगडमच्या रॉयल एअरफोर्स ची सहाय्यक कंपनी म्हणून करण्यात आली. भारतीय वायुसेनेने पहिले स्क्वाड्रन तयार केले आणि ८ ऑक्टोबरला ते मिशन पूर्ण केले. त्यानंतर वायुसेनेने अनेक पराक्रम केले. अल्पावधीतच भारतीय वायुसेना जगातील सर्वात शक्तिशाली वायुसेना बनली. तेव्हापासून ८ ऑक्टोबर हा दिवस भारतीय नौसेना दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी हवाई दलात योगदान देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा सन्मान केला जातो. यादिवशी भारतीय वायू सेनेकडून परेड, एअर शो सादर केले जातात. मागील वर्षी उत्कृष्ट कामगिरी केलेल्या योद्ध्यांना या दिवशी पुरस्कार दिला जातो. त्यांचा यथायोग्य सन्मान केला जातो. सुब्रोतो मुखर्जी हे भारतीय वायू दलातील स्क्वाड्रनचे पहिले प्रमुख होते. १२ मार्च १९४५ रोजी वायुदलाचे नाव रॉयल इंडियन एअर फोर्स झाले. सुरुवातीला भारतीय वायुदलाकडे खूप कमी विमाने आणि साधनसामुग्री होती. १९४७ मध्ये विमानांना पिस्टनवर चालणारी इंजिने बसवलेली असत. जेट इंजिनांच्या आगमनानंतर त्याची जागा वेगवान जेट विमानांनी घेतली. प्रथम नॅट, हंटर, कॅनबेरा यासारखी ब्रिटिश बनावटीची विमाने वायुसेनेत सहभागी केली गेली. त्या नंतर तंत्रज्ञानाच्या कसोटीवर त्यांची जागा फ्रेंच बनावटीच्या विमानाने घेतली. भारतीय परराष्ट्र धोरणामुळे आणि रशियाने उत्तम सहकार्य केल्याने दणकट बनावटीची रशियन बनावटीची लढाऊ आणि मालवाहू विमाने सहभागी करण्यात आली. तसेच रशियन हेलिकॉप्टर्स सहभागी करण्यात आली. सद्य काळात आधुनिक रडार यंत्रणा, क्षेपणास्त्रे, दळणवळण यंत्रणा, नेटवर्क सेंट्रिक वॉरफेअर सी-४ आय ही संगणक प्रणाली वायुसेनेकडे आहेत. हवेतल्या हवेत इंधन पुरवठा करणारी विमाने, विमानातून रडार वापरून दूर अंतरावरील शत्रूच्या विमानांची टेहळणी करणारी यंत्रणा, कक्षेबाहेरील शत्रूच्या ठिकाणाचा वेध घेणारी इत्यादी अत्यंत आधुनिक शस्त्रास्त्रे सेनेत सहभागी करण्यात आली आहेत. आज भारतीय वायू दल जगातील सर्वात शक्तिशाली वायू दल समजले जाते. भारतीय वायू दल जातील चौथ्या क्रमांकाचे सामर्थ्यशाली वायू दल आहे. अमेरिका, रशिया आणि चीन पाठोपाठ भारताचेच वायू दल सर्वात मोठे वायू दल आहे. भारतीय वायू दलाची कामगिरी १४५ कोटी भारतीयांना अभिमान वाटावी अशी दैदिप्यमान आहे. ज्या ज्या वेळी देशाकडे शत्रूने वाकड्या नजरेने पाहिले त्या त्या वेळी भारतीय वायू दलाने उत्तुंग कामगिरी करून शत्रू राष्ट्राला दाती तृण धरायला लावले. १९४७/४८, १९६२, १९६५, १९७१, १९९९ साली झालेले कारगिल युद्ध किंवा नुकतीच झालेली ऑपरेशन सिन्दुर मोहीम या सर्व युद्धात भारतीय वायू दलाने महत्वाची भूमिका बजावली. भारतीय वायू दल हा भारतीय संरक्षण दलाचा मानबिंदू आहे. भारतीय वायू दल दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

### वाचक मनोगत

## किमान आरोग्य सुविधा अपेक्षित आहे

खरंच लाज वाटावी अशी गोष्ट आहे की आमचा आमदार सलग ४ वेळा निवडून आला आहे, खासदार स्वतः MBBS डॉक्टर आहेत,आणि तरीही कल्याण-डोंबिवलीसारख्या मोठ्या शहरात साप चावल्यानंतर सरकारी रुग्णालयात अँटी-वेनम सारखं मूलभूत औषध उपलब्ध नाही. हे लोकप्रतिनिधींच्या अपयशाचं जिवंत उदाहरण आहे. निवडणुकीआधी आश्वासनं देताना वेळ मिळतो, पण जेव्हा सामान्य माणसाचा जीव धोक्यात येतो तेव्हा सगळे गायब होतात. डॉक्टर खासदार असूनही जर आरोग्य सेवा सुधारल्या जात नसतील, तर त्या पदांचा उपयोग काय? जनतेचा पैसा फक्त जाहिराती, रस्ते, पूल, इव्हेंट्स, आणि फोटोसाठी खर्च होतो का? सरकारी हॉस्पिटलमध्ये मूलभूत सुविधा नसतील, तर स्मार्ट सिटीचं स्वप्न म्हणजे निव्वळ फसवणूक आहे. राजकारण केवळ खुर्चीसाठी न करता, जनतेच्या जीवितासाठी केलं पाहिजे. निवडून दिलं म्हणजे काम करण्याची जबाबदारी घेतली पाहिजे,ती झटकून टाकू शकत नाही.कृपया लोकांचे प्राण वाचवण्यासाठी किमान आरोग्य सुविधा तरी द्या. मेट्रो, सॅटिस किंवा स्मार्ट सिटी असा विकासासाठी अजुन दहा वर्षे तरी लागतील, एक फायदा आहे, त्या अवधीत तीच तीच आश्वासने देऊन परत परत निवडून येण्यास कारण ठरतील.

**- सुनिल इंगळे, कल्याण**

# लिपिक, लेखा संवर्गातील कर्मचाऱ्यांचा उपोषणाचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : राज्यातील लिपिक व लेखा संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांची पूर्तता होत नसल्याने सर्व कर्मचारी संघटना एकत्र आल्या आहेत. सरकारी स्तरावर वारंवार पाठपुरा करूनही त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे राज्याच्या सर्व जिल्ह्यातील कर्मचारी मुंबईच्या आझाद मैदानावर धडकणार आहेत. दिनांक 15 व 16 ऑक्टोबर 2025 रोजी त्यांच्या प्रलंबित मागण्यासाठी दोन दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा कर्मचारी संघटनांकडून देण्यात आलेला आहे.

राज्यातील लिपिक व लेखा संवर्गनातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीतील त्रुटी दूर करणे व लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांचा पदोन्नती स्तर कमी करणे या प्रमुख मागण्यांसाठी सरकार स्तरावर संघटनांच्या माध्यमातून वारंवार पाठपुरावा सुरू आहे. विशेष म्हणजे या संदर्भात स्थापन केलेल्या कृती समितीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी जुलैमध्ये ग्रामविकास मंत्र्यांचे निवेदनाद्वारे लक्ष वेधले होते. मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने सर्व कर्मचारी संघटना मुंबईच्या आझाद मैदान वर दिनांक 15 व 16 ऑक्टोबर रोजी असे दोन दिवस लाक्षणिक उपोषण करून सरकारचे लक्ष वेधनार असल्याचे संघटनेचे सचिव मेघराज निमसे यांनी सांगितले.

या पार्श्वभूमीवर संघटनांच्या बैठका सुरू आहेत. मुंबई येथील या उपोषणासाठी अलिबाग, ठाणे नाशिक, अकोला, अमरावती, नागपूर ,यवतमाळ, सोलापूर, सांगली, परभणी, नांदेड, अहिल्यानगर, धाराशिव, धुळे या सर्व जिल्ह्यातील संघटनांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. तरी ठाणे येथील कर्मचाऱ्यांनी उपोषणासाठी उपस्थित राहावे असे आवाहन ठाणे जिल्हा परिषद कर्मचारी युनियन जिल्हा अध्यक्ष गजानन विशे, सचिव राहुल नगराळे, जिल्हा उपाध्यक्ष विजय चव्हाण, सुधीर घोलप तसेच प्रसिद्धी प्रमुख निलेश भांगे यांनी केले आहे.

# रखडलेला बाळगंगा धरण प्रकल्प कधी पुर्ण होणार ?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




**पेण** : रायगड जिल्हयात पेण तालुक्यामध्ये बाळगंगा धरणाचे काम जवळ जवळ 80 टक्के पूर्ण झाले असून या बाळगंगा प्रकल्पाला 2009 ते 2010 वर्षापासून सुरुवात करण्यात आली असून आज 16 वर्ष होत आली तरी सुध्दा या भागातील एकूण 6 ग्रामपंचायती हददीतील 9 महसूली गावे आणि 13 आदिवासी वाडया मिळून जवळ 3हजार कुटूंबे विस्थापित होणार आहेत विशेष म्हणजे या प्रकल्पात मध्ये आदिवासी बांधवांची संख्या मोठया प्रमाणावर आहे.याभागात आजपर्यंत कोणत्याच गावाचे पुनवर्सन झालेले नाही. जमिनीचा मोबदला, पुनर्वसनासाठी प्लॉटचे वाटप, घरांच्या किंमती, पुनर्वसन आराखडा,हे सर्व प्रश्न आजपर्यंत सुटले नाहीत कारण प्रकल्पग्रस्तांचे असणारे प्रश्न सोडवण्यासाठी कोणताही अधिकारी आपली भूमिका स्पष्ट करत नाही त्यामुळे प्रकल्पग्रस्तांची नाराजी दिसून येत आहे.

आजपर्यंत 16 वर्षाच्या कालावधीत तीन निवडणूका झाल्या परंतु एकाही लोकप्रतिनिधी कडून हा प्रश्न सुटला नाही त्यामुळे यापुढे शेतकऱ्यांनी प्रकल्पासाठी जागा द्यायची की नाही असा प्रश्न शेतकऱ्यांमध्ये पडला आहे. संतप्त प्रकल्पग्रस्तांनी लोकसभेला बहिष्कार टाकला होता.तसेच विधानसभा निवडणुकीत सुद्धा बहिष्कार कायम ठेवणार होते परंतु तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रचार सभेत बाळगंगा प्रकल्प प्रलंबित प्रश्न विधानसभा निवडणुक झाल्या नंतर लगेचच सोडवू असे आश्वासन त्यावेळी दिले होते त्याचे काय झाले? ते हवेत विरले की काय?असा सवाल शेतकऱ्यांकडून विचारला जात आहे.नवीन मुंबई येथील आतंरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प पूर्ण होत असून त्याच प्रकल्पाला पाणी पुरवठा केला जाणाऱ्या बाळगंगा प्रकल्पचे आजही प्रश्न प्रलंबित आहे या प्रकल्पाचे प्रश्न कधी पुर्ण करणार असा सवाल प्रकल्प ग्रस्त शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

प्रकल्प किंवा पुनर्वसन व इतर सर्व गोष्टींना वेळ होत आहे प्रकल्प प्रकल्पग्रस्तांसमोर नवनवीन प्रश्न आव्हाने हेलावत आहे घर बांधण्यासाठी लागणारा साहित्याची किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत मिळणाऱ्या घरांचा मोबदला याविषयी प्रकल्पग्रस्त धास्तावला आहे सध्या तरी प्रकल्पग्रस्त पूर्णपणे गडबडून गेला कारण आश्चर्यकारक बाब म्हणजे अजून येथील प्रकल्पग्रस्तांना माहीत नाही आपले पुनर्वसन कुठे होणार ? कुटुंबातील व्यक्तीला प्लॉट कोणाला मिळणार, तसेच किती मिळणार, कसा मिळणार , आणि कुठे मिळणार? याच विचाराने प्रकल्पग्रस्त आजही संभ्रमात आहे. विशेष म्हणजे या धरणाला ग्रामस्थांनी विरोध केला नाही.आधी पुनर्वसन मग धरण या कायद्या प्रमाणे शासनाने काहीही न करता या धरणाचे 80 टक्के काम पुर्ण केले आहे. मात्र, या धरणग्रस्तांचे पुनर्वसन काम शुन्य टक्केच आहे. त्यामुळे शासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने येथील बाळगंगा प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालेला नाही.

**शासनाचा उदासीनतेमूळे प्रकल्प रखडला**

**शासनाने हलगर्जीपणामुळे या प्रकल्पाकडे दुर्लक्ष केल्याने या प्रकल्प ग्रस्तांचे बेकायदेशीर निवाडे प्रसिध्द केल्यामुळे त्यामध्ये अनेक गंभीर चुका निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे हा निवाडा चुकीचा आहे. म्हणून प्रकल्पग्रस्तांना न्याय निवाड्यासाठी कोर्टाचा आधार घ्यावा लागला. मग शासन या प्रकल्पग्रस्तांच्या गंभीर समस्येवर विचार करणार आहे किंवा नाही. नसेल तर त्यांचे 7/12 नावे करण्यात यावे. याबाबत शासनाने कालमर्यादेत ठोस पाऊल उचलणे अत्यंत गरजेचे आहे अन्यथा प्रकल्पग्रस्त पुन्हा शासनाचे विरोधात आंदोलन करण्याची पवित्र्यात आहे.त्यामुळे शासनाने याची दखल घ्यावी अशी मागणी संतप्त बालगंगा प्रकल्प ग्रस्तांन कडून केली आहे.**

बाळगंगा धरण प्रकल्पाचे पाणी नवी मुंबईतील जनतेला पाण्याची गरज पुरविण्यासाठी सिडको मार्फत राबविणेत येत आहे. तशा प्रकारचा कराराही सिडको व शासन यांचेमध्ये झालेला आहे. शासनाने प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व सोयीसुविधा पूर्ण करण्याची जबाबदारी शासनाच्या विविध विभागांना दिलेली होती पंरतू हे विभाग बाळगंगा प्रकल्पाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे प्रकल्पावेळी जाहीर झालेल्या निवाडयात घरे, मंदिर, झाडे, फळझाडे, पॅकेज, आकारफोड न झालेले क्षेत्र याची फेरतपासणी,फेरमुल्यांकन व फेर निवाड्याव्दारे सरसकट सर्वांना सारखाच दर देण्याबाबतची धरणग्रस्तांची मागणी होती ती मिळावी अशी मागणी प्रकल्पग्रस्तांकडून केली जात आहे.

**आंतरराष्ट्रीय विमानतळाला व नवी मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या बाळगंगा प्रकल्पाला 16 वर्षे होत आली तरी आजही एकही प्रश्न सुटला नाही अनेक आंदोलने केली परंतु फक्त आश्वासने ? गल्ली पासून ते दिल्ली पर्यत सत्ता असून सुद्धा प्रश्न मार्गी लागत नसतील तर शासन अजून शेतकऱ्यांची किती पिळवणूक करणार.जवळ जवळ ३ हजार कुटुंबे पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत आहेत,महाराष्ट्रातील सर्वात मोठे पुनर्वसन आहे." आदिवासी,गोरगरिब, दिन दुबळया शेतकऱ्याने आपल्या शेती घरावर तुळशीपत्र सोडले, त्यांना वाऱ्यावर सोडून असे विकासाचे प्रकल्प करून त्याचा काय उपयोग. - अविनाश पाटील बाळगंगा संघर्ष समिती अध्यक्ष**

# मुंबई आझाद मैदानावर कुणबी एल्गार मोर्चा!



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे,पालघर जिल्ह्यासह समस्त कोकणातील कुणबी एकवटणार**

**मुरबाड** : कुणबी समाजाला मिळालेल्या ओबीसी आरक्षणात वाटेकरी वाढत असल्याने समस्त ओबीसी समाजाचे आरक्षण संकटात सापडले आहे.त्यामुळे आपले आरक्षण वाचविण्यासाठी 9 ऑक्टोंबर रोजी मुंबई आझाद मैदान येथे एल्गार मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सरकारला दखल घ्यावी असा भव्य मोर्चा मुंबईत होत असून त्याचे नियोजन चालू आहे.

कोकणासह ठाणे ,पालघर जिल्ह्यात मोठ्या संख्येने कुणबी समाज आहे.त्यामुळे ठाणे, पालघर जिल्ह्यातून मोठ्या संख्येने समाज बांधव सहभागी होणार असून मुरबाड, शहापूर मध्ये मोर्चाचे नियोजन करण्यासाठी बैठकांचे आयोजन करण्यात आले आहे. मिळेल त्या वाहनाने किंवा रेल्वेने मुंबई गाठून आझाद मैदानावर समाजाचि एकजूट व ताकद सरकारला दाखवून द्यायचि असून हैद्राबाद गॅझेट रद्द झालाच पाहिजे या प्रमुख मागणीसह ओबीसी समाजाच्या ईतर मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी या मोर्चाचे आयोजन केले आहे. म्हणून लाखोंच्या संख्येने मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन कुणबी समाजोन्नती संघ मुंबई व सर्व ओबीसी संघटनांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांनी अपडेट असणे गरजेचे आहे - चंद्रशेखर दलाल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**वाशिंद** : सद्याची परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांनी त्यात अपडेट असणे अत्यंत महत्वाचे आहेच तसेच शिक्षण घेत असताना प्रामाणिक असणेही गरजेचे आहे असे प्रतिपादन टिटवाळा येथे वैश्य समाजाच्या वतिने आयोजीत केलेल्या विद्यार्थी गुण गौरव समारंभात केले.

ठाणे-- पालघर जिल्हा वैश्य समाजातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा टिटवाळा येथील अशोक बँक्वेट हॉल येथे संपन्न झाला.

वैश्य समाजातील डॉक्टर, इंजिनियर ,उच्च विभूषित ,दहावी, बारावी विशेष प्राविण्य अशा दीडशे विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला, यामध्ये वयाच्या पन्नाशीनंतर पदवी घेणारे अशा तीन समाज बंधू- भगिनींचाही गौरव करण्यात आला.

विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभासाठी अध्यक्ष निलेश गंधे, प्रमुख पाहुणे चंद्रशेखर दलाल ( माजी मुख्याध्यापक) गणेश शिक्षण प्रसारक मंडळ टिटवाळा व सौ.अश्विनी अशोक दलाल (सदगुरू साईनाथ ट्रस्ट टिटवाळा, दिलीप भोपतराव( समन्वय समिती प्रमुख), सावित्रीताई आंबवणे (विश्वस्त प्रमुख ),व दिलीप पातकर (विश्वस्त) उमेश कोंडलेकर ( पदसिद्ध विश्वस्त) व्यासपीठावर उपस्थित होते.

उपस्थित विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे चंद्रशेखर दलाल सर यांनी विद्यार्विध्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की शिक्षणाबरोबर प्रॅक्टिकल ज्ञान असणे गरजेचे आहे, तसेच शिक्षण घेत असताना, सध्याची परिस्थिती लक्षात घेता आपण त्यात अपडेट असणे अत्यंत महत्त्वाचे आहे व शिक्षण घेत असताना प्रामाणिक असणे गरजेचे आहे. असे मोलाचे मार्गदर्शन यावेळी केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता सभापती वैभव गंधे व त्यांच्या सहकाऱ्यांनी खूप मेहनत घेतली तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयुरेश आळशी यांनी केले तसेच या कार्यक्रमा साठी उपाध्यक्ष प्रियेश जगे,उपाध्यक्ष निलेश कोंडलेकर, जिल्हा स्त्री प्रतिनिधी सौ. पूजा काबाडी, सौ.मयुरी तोंडलीकर, सर्व विश्वस्त, सल्लागार ,माजी अध्यक्ष राजाभाऊ पातकर , जयंत सोनटक्के, प्रकाष तांबोळी, चंद्रकांत खडकबाण , , विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमासाठी हॉल उपस्थित करून दिल्या बद्दल अध्यक्ष गंध्ये यांनी साई दलाल यांचा विशेष सत्कार करून आभार मानले.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in






**मेष**
कामासाठी दुसऱ्या शहरात जावे लागू शकते. तुमच्या आवश्यक गोष्टी व्यवस्थित ठेवा जेणेकरून गरज पडल्यास तुम्हाला कोणाकडेही मागावे लागणार नाही.

**वृषभ**
कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण होईल.प्रलंबित कामे पूर्ण करालच, पण नवीन ध्येयेही निश्चित कराल. मेहनतीवर विश्वास ठेवलात तर गोष्टी सुरळीत होतील.

**मिथुन**
मेहनतीचे पूर्ण फळ तुम्हाला मिळेल आणि तुम्ही जे काही हाती घ्याल ते यशस्वी होईल. ड्रेसिंग सेन्सची ऑफिसमध्ये प्रशंसा होईल, ज्यामुळे चांगले वाटेल.

**कर्क**
भविष्यात तुम्हाला लक्षणीय आर्थिक लाभ होतील. तुमचे वैवाहिक जीवन आज आनंदी राहील; तुम्ही तुमच्या मुलांसोबत बाहेर फिरायला जाऊ शकता.

**सिंह**
कौटुंबिक जीवनात सुसंवाद राहील आणि सर्वजण एकमेकांना पाठिंबा देतील. आज तुम्ही एखादे काम पूर्ण करण्यासाठी नवीन पद्धती वापरून पाहू शकता.

**कन्या**
जोडीदारासोबत चित्रपट पाहण्याची योजना कराल, ज्यामुळे नाते सुधारेल.व्यवसाय सुरळीत सुरू राहतील आणि जुन्या ग्राहकांकडून दुप्पट आर्थिक नफा मिळेल.

**तूळ**
अभ्यासासाठी आणि करिअरसाठी अधिक मेहनत करण्याची आवश्यकता आहे..कोणतेही काम हाती घेण्यापूर्वी, गोंधळ टाळण्यासाठी संपूर्ण रणनीती आखा.

**वृश्चिक**
बदलत्या हवामानात, तुमच्या आरोग्याची काळजी घ्या आणि तळलेले पदार्थ टाळा. ऑफिसमधील कर्मचाऱ्यांसोबत व्यवसायाबाबत बैठक घेऊ शकता.

**धनु**
ऑफिसमध्ये सहकाऱ्यांसोबत नवीन प्रकल्पावर चर्चा करू शकता, ज्यामुळे कंपनीला मोठा फायदा होईल. कुटुंबासोबत वेळ घालवण्याचा अनुभव छान असेल.

**मकर**
दिवसाच्या सुरुवातीला काही गोंधळ होऊ शकतो, परंतु कुटुंबाच्या मदतीने सर्वकाही सोडवले जाईल. नवीन योजनेवर काम केल्याने चांगले परिणाम मिळू शकतात.

**कुंभ**
नवीन रोजगाराच्या संधी मिळतील, ज्याचा फायदा घेऊन तुम्ही जीवनात पुढे जाऊ शकता. कठोर परिश्रम आणि समर्पणाने तुम्ही एखादे काम लवकर पूर्ण कराल.

**मीन**
कामाची गुणवत्ता सुधारण्यावर लक्ष केंद्रित करू शकता. कुटुंबासाठी थोडा वेळ काढल्याने नातेसंबंध मजबूत होतील आणि आत आनंदी वातावरण निर्माण होईल.

नियमित वाचा
दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# वृध्दाला भरधाव रिक्षाची धडक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** दसऱ्याच्या पूर्वसंध्येला डोंबिवली पूर्वेतील बापूसाहेब फडके रस्त्यावर खरेदीसाठी आलेल्या एका ७० वर्षाच्या वृध्दाला भरधाव वेगात असलेल्या एका रिक्षा चालकाने जोराची धडक दिली. या धडकेत या वृध्दाला गंभीर दुखापत झाली आहे. या वृध्दाला कोणतीही मदत न करता रिक्षा चालक नेहरू मैदान दिशेने रिक्षेसह पळून गेला.

कल्याण, डोंबिवलीत अशा मुजोर, बेशिस्त रिक्षा चालकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वाहतूक विभाग यांनी संयुक्त मोहीम हाती घेऊन अशा मुजोर रिक्षा चालकांवर दंडात्मक आणि कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

चंद्रशेखर रघुनाथ पाटणकर (७०) असे रिक्षेच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या वृध्दाचे नाव आहे. ते डोंबिवली पूर्वेतील मानव कल्याण केंद्र परिसरातील एका सोसायटीत राहतात. बुधवारी संध्याकाळी दसऱ्याच्या पूर्वसंध्येला चंद्रशेखर पाटणकर फडके रोड भागात दसऱ्यानिमित्त वस्तू खरेदीसाठी आले होते. फडके रस्त्यावरील वृंदावन हॉटेल समोरील रस्त्यावर खरेदी करत असताना अचानक त्या ठिकाणाहून भरधाव वेगात गर्दीतून वाट काढत रिक्षा चालक चालला होता. त्या रिक्षा चालकाने निष्काळजीपणे, भरधाव वेगातील रिक्षेची चंद्रशेखर पाटणकर यांना पाठीमागून जोराची धडक दिली.

या धडकेत पाटणकर रस्त्यावर पडले. त्यांच्या हात, पायाला दुखापत झाली. वृध्द रस्त्यावर पडले म्हणून इतर पादचाऱ्यांनी त्यांना उठून एका बाकड्यावर बसविले. त्यांना पाणी पिण्यास दिले. या सगळ्या धावपळीत ठोकर मारणाऱ्या रिक्षा चालकाने तेथे थांबून पाटणकर यांना डॉक्टरकडे उपचारासाठी नेणे आवश्यक होते. तो तेथून इतर नागरिकांना चकवा देत भरधाव वेगात नेहरू मैदान दिशेने रिक्षा घेऊन पळून गेला.



# बुलेट ट्रेन चे म्हातार्डी स्थानक होणार जिल्ह्यातील एकात्मिक वाहतूक केंद्र

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक संपन्न !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरील ठाणे जिल्ह्यातील म्हातार्डी येथील स्थानक हे केवळ हायस्पीड रेल्वेचा थांबा नसून, एकात्मिक वाहतूक केंद्र (Integrated Transport Hub) म्हणून विकसित करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलण्यात येते आहे. यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत नुकतीच एक विशेष बैठक पार पडली. या बैठकीत म्हातार्डी बुलेट ट्रेन स्थानकाला ठाणे आणि कोपर रेल्वे स्थानक तसेच तळोजा मेट्रो स्थानक यांच्याशी जोडण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी महारेल तर्फे या प्रस्तावाचे सविस्तर आरेखन आणि संकल्पचित्र सादर करण्यात आले.

मुंबई अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या उभारणीचे काम सध्या मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात वेगाने सुरू असल्याचे दिसते आहे. काही दिवसांपूर्वी याच प्रकल्पातील एका बोगद्याच्या कामाची पाहणी रेल्वे मंत्र्यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. ठाणे जिल्ह्यातील बुलेट ट्रेनचे स्थानक दिवा जवळ म्हातार्डी येथे होणार आहे. त्यामुळे म्हातार्डी रेल्वे स्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी वेगाने सुविधा उपलब्ध कराव्या लागणार आहेत. सध्या या जागेपर्यंत पोहोचण्यासाठी योग्य मार्ग नाही. रस्ते मार्ग प्रशस्त नाहीत. दिवा आणि कोपर रेल्वे स्थानकांदरम्यान हे स्थानक असणार आहे. त्यामुळे येथे पोहोचण्यासाठी वाहतूक व्यवस्था उभारण्याचे प्राधान्य सध्या सरकारचे आहे. याच पार्श्वभूमीवर नुकतीच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत एक बैठक संपन्न झाली. यावेळी म्हातार्डी बुलेट स्थानक एकात्मिक वाहतूक केंद्र म्हणून विकसीत करण्यावर चर्चा झाली. यासाठी आराखडा सादर करण्या आला. या आराखड्यातून म्हातार्डी स्थानकातून प्रवाशांना थेट ठाणे, कोपर आणि नवी मुंबईतील तळोजा मेट्रो स्थानकांपर्यंत सहज व जलद पोहोचता यावे, यासाठी विविध पर्याय मांडण्यात आले. यात सुलभ रस्ते जाळे, सार्वजनिक वाहतूक सुविधा, तसेच मेट्रो आणि रेल्वे जोडणी अशा बहुआयामी उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी हायस्पीड रेल्वे प्राधिकरणास हा प्रस्ताव सकारात्मकपणे तपासून रेल्वे मंत्रालयाकडे पाठविण्याच्या सूचना दिल्या. हायस्पीड रेल्वे प्राधिकरण (NHSRCL) लवकरच याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करून मंत्रालयाला सादर करणार आहे. प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर ठाणे जिल्ह्यातील प्रवाशांना बुलेट ट्रेन स्थानकापर्यंत जाण्यासाठी सुलभ व एकात्मिक प्रवासाचा अनुभव मिळेल.

ठाणे जिल्ह्यात दिवाजवळ बांधण्यात येणारे म्हातार्डी स्थानक हे मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन मार्गावरील महत्त्वाचे जंक्शन ठरणार असून, पुढील काळात हे ठिकाण मुंबई महानगर प्रदेशातील वाहतुकीचे केंद्रबिंदू बनेल. या बैठकीला उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव नवीन सोना, महारेल आणि हायस्पीड रेल्वे प्राधिकरणाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत तीन वर्षात 48 हजार 437 श्वानांचे निर्बिजीकरण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



**डोंबिवली** - कल्याण डोंबिवली पालिक हद्दीत ८० ते ९० हजार भटके श्वान आहेत. मागील तीन वर्षाच्या कालावधीत ४८ हजार ४३७ भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आले आहे. याच कालावधीत ५१ नागरिकांना विविध भागात श्वान दंश झाले आहेत. मागील तीन वर्षाच्या कालावधीत कल्याण डोंबिवली पालिका प्रशासनातील आरोग्य विभागाने भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण आणि लसीकरणावर एकूण चार कोटी २३ लाख ८४ हजार ५८४ रूपये खर्च केले आहेत, अशी माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाने माहिती अधिकारात दिली आहे.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील भटक्या श्वानांची वाढती संख्या विचारात घेऊन पालिका प्रशासन या श्वानांचे निर्बिजीकरण, लसीकरण आणि त्यांचा निवारा याविषयी काय सुविधा पुरवते. यासाठी किती खर्च करते याची माहिती डोंबिवलीतील जागरूक नागरिक विवेक पाठक यांनी पालिकेच्या आरोग्य विभागाकडे मागितली होती. आरोग्य मुख्यालयातील अधीक्षक अनिता राठोड यांनी ही माहिती दिली आहे.

या माहिती अधिकारातील माहिती अशी, कल्याण डोंबिवली पालिका हद्दीत ८० ते ९० हजार भटके श्वान आहेत. मागील तीन वर्षात जुलै २०२५ पर्यंत पालिकेच्या पत्रीपूल सर्वोदय मॉल समोरील निर्बिजीकरण केंद्रात ४८ हजार ४७३ भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आले. सन २०२२ ते जुलै २०२५ या कालावधीत पालिका हद्दीत ५१ हजार ५१ नागरिकांना भटके श्वान चावले. मागच्या तीन वर्षात रेबिज श्वान दंशाची एक हजार १७६ प्रकरणे आढळली. मागच्या तीन वर्षात ४८ हजार ४७३ भटक्या श्वानांचे निर्बिजीकरण करण्यात आले.

# आदर्श शिक्षकच आदर्श समाज घडवतात - डॉ. आनंदराव सूर्यवंशी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी दि. ७**

जागतिक शिक्षक दिनाचे औचित्य साधून रविवार दिनांक ५ ऑक्टोबर रोजी साप्ताहिक कल्याण नागरिक चे संपादक मच्छिंद्र कांबळे यांच्या 'गुरुवंदना विशेषांक २०२५' च्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.




पद्मश्री मा. गजानन माने यांनी अध्यक्ष पदाची धुरा वाहिली. ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ डॉ. आनंदराव सूर्यवंशी हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते . सर्वप्रथम वृद्धाश्रमासाठी -वृद्धांच्या सेवेसाठी ॲम्ब्युलन्स चे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले . सदर प्रसंगी अभिनव विद्यामंदिर कल्याण येथील सभागृहात गुरुवंदना विशेषांकाचे दीपप्रज्वलनानंतर प्रकाशन करण्यात आले . मान्यवरांची भाषणे झाली . राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक विजय देसले यांनी प्रास्ताविक केले . मच्छिंद्र कांबळे यांनी मनोगत व्यक्त करतांना समाज घडविणाऱ्या पुरस्कार प्राप्त सर्व 33 आदर्श शिक्षकांच्या कार्याचा आढावा थोडक्यात घेतला. नियोजित कार्या संदर्भात माहिती दिली. ते म्हणाले , "शिक्षण हा एक चांगला संस्कार मानला जातो आणि ह्या संस्काराचा मुख्य शिल्पकार शिक्षक आहे . मान्यवरांच्या हस्ते आपला गौरव होत आहे याचा मला मनस्वी आनंद होत आहे." " आपल्या देशात गुरुशिष्य परंपरा अमर आहेत जसे ज्ञानदेव -निवृती नाथ , एकनाथ -जनार्दन . अर्जुन -द्रोणाचार्य , कर्ण - परशुराम , श्रीराम - वशिष्टमुनी तसेच श्रीकृष्ण - सांदीपनी इ. आपल्या पवित्र शिक्षकी पेशेवर निष्ठा व श्रद्धा ठेवाआणि पिढी घडवा. आदर्श शिक्षकच आदर्श समाज घडवतात" असे उद्गार डॉ सुर्यवंशी यांनी काढले. तसेच आदर्श शिक्षकांचे त्यांनी अभिनंदन केले . सदर प्रसंगी व्यासपीठावर प्रा अनिल बोरनारे , डॉ संजय लाटकर , कडोंमपा चे सचिव किशोर शेळके ,निवृत निरीक्षक क्षिरसागर आणि प्रा . गीते सर ( अभिनव विद्यालय पारनाका कल्याण ) उपस्थित होते. आदर्श शिक्षकांचा ट्रॉफी सन्मानपत्र व गुलाब पुष्प देऊन आदरपूर्वक गौरव करण्यात आला . प्रा . अविनाश सोनवणे यांनी उत्तम शैलीत सूत्रसंचालन केले. व्यासपीठावरील अध्यक्ष , अतिथी आणि उपस्थितांच्या आभार प्रदर्शनानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली .

# केडीएमसी अतिरिक्त आयुक्त 'ऑन फिल्ड !'

## प्रभाग अधिकाऱ्यांसमवेत समक्ष घेतला कर वसुलीचा आढावा!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण / दि. 7**

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी कर करप्रणालीशी संबंधित सर्व अधिकाऱ्यांना कर वसुलीवर लक्ष केंद्रित करून जास्तीत जास्त करवसुली करणेबाबत निर्देश दिले आहेत, त्या अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी आज दुपारी स्वतः २/ब प्रभाग क्षेत्र व ३/क प्रभाग क्षेत्र कार्यालयास भेट देऊन ,ब प्रभागाच्या सहा. आयुक्त प्रीती गाडे व क प्रभागाचे सहा.



आयुक्त धनंजय थोरात यांचे समवेत संबंधित प्रभागातील कर वसुलीचा आढावा घेतला आणि कर विभागातील अधिक्षक/वरिष्ठ लिपीक तसेच प्रत्येक भाग लिपीक यांचेकडून त्यांचेकडे असलेली भाग निहाय थकबाकीदारांची यादी, तसेच सर्वोच्च थकबाकीदारआणि वारंवार नोटीस बजावून देखील थकबाकी प्रलंबित असलेले मालमत्ता करधारक यांचे माहिती संकलीत करुन त्यांचेवर तातडीने जप्ती, लिलाव तसेच कायदेशीर कारवाई प्रस्तावित करणेबाबत निर्देश दिले.

आढावा बैठकीत प्राप्त झालेल्या थकबाकीदारांच्या यादीनुसार अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी ३/क प्रभागातील अधिक्षक बजागे यांचेसमवेत मे. शेलार कन्स्ट्रक्शन यांच्या कार्यालयास भेट दिल्याने मे. शेलार कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत श्री. चेतन शेलार यांनी मालमत्ता कर थकबाकी एकूण रक्कम रु. १९,८९,५८२/- चा धनादेश अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांचेकडे जमा केला.

दरम्यान, महापालिका आयुक्तांच्या निर्देशानुसार करवसुलीसाठी प्रयत्नांची शिकस्त केली जाणार आहे. नागरिकांनी देखील आपला कर वेळेत भरून महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# नवी मुंबई मनपाच्या प्रभागांवर शिक्कामोर्तब

## १११ सदस्य, २८ प्रभागांवर शिक्कामोर्तब

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशी, ता. ७ (बातमीदार) :** नवी मुंबई पालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभागरचनेची अंतिम अधिसूचना राज्य शासनाने सोमवारी (ता. ६) जाहीर केली आहे. महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ अंतर्गत कलम ५ (३) अन्वये राज्य शासनाच्या मंजुरीनंतर प्रभागांची अंतिम संख्या आणि रचना निश्चित केली आहे. त्यानुसार १११ नगरसेवक, तर २८ प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य शासनाच्या नियुक्त अधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर ही अधिसूचना प्रसारित करण्यात आली आहे. याआधी २२ ऑगस्ट २०२५ रोजी प्राथमिक अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यावर हरकती, सूचना घेण्यात आल्या होत्या. जवळपास अडीच हजार हरकती नोंदवल्या गेल्या. विष्णुदास भावे नाट्यगृहात हरकती, सूचनांवर सुनावणीनंतर अंतिम प्रभागरचनेसाठी राज्य निवडणूक आयोगाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला. त्यानुसार अंतिम प्रभागरचना जाहीर झाली आहे. आता अंतिम प्रभागरचनेवर कोणतीही हरकत सूचना किंवा अनुषंगाने सुनावणी नियमांनुसार घेण्यात आली नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे, तर राज्य शासनाच्या अधिसूचनेनुसार ही अंतिम प्रभागरचना आगामी सार्वत्रिक निवडणुकीत लागू राहणार आहे.

- नवी मुंबई महापालिकेच्य प्रभाग क्रमांक १ मध्ये असणारा भाग प्रभाग क्रमांक २ मध्ये गणपतीपाडा घेण्यात आला आहे. प्रभाग क्रमांक १४ मध्ये असणारा पावणे गाव हा परिसर वगळण्यात आला आहे. त्याचप्रमाणे नेरूळ गावाचे विभाजन करण्यात आले होते. सर्वात जास्त हरकती आल्या होत्या. नेरूळ गाव प्रभाग क्रमांक २४ मध्ये टाकण्यात आला आहे. जुईनगर गावांमध्ये १८ नंबर प्रभागात होता. ता परिसर २२ नंबर प्रभागात टाकण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे बेलापूरमधील किल्ले गावठाणचा परिसर प्रभाग क्रमांक २६ मध्ये होता. तो प्रभाग २७ मध्ये आहे. नवी मुंबई महापालिकेची प्रभागरचना भाजप, शिवसेना रिंदि गटासाठी सोईस्कर आहे. दोन्ही पक्ष 'तू मारल्यासारखं कर, मी रडल्यासारखं करतो' असे दाखवत आहे, पण नवी मुंबईचा महापौर हा काँग्रेसच्या टेकूशिवाय कधीच बसला नाही.

# जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या प्रारुप मतदार याद्या तहसिलदार कार्यालयात उपलब्ध

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे,दि.07 :-** मा.सचिव, राज्य निवडणुक आयोग, महाराष्ट्र यांच्याकडील आदेश क्रमांकः- रानिआ/जिपपंस-2025/प्र.क्र.20/ का-7, दि.23/09/2025 अन्वये राज्यातील 32 जिल्हा परिषदा व 336 पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केलेला आहे. त्यानुषंगाने, ठाणे जिल्हा परिषद व पंचायत समिती शहापूर / मुरबाड / कल्याण / भिवंडी /अंबरनाथच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रारुप मतदार यादी संबंधित तालुक्याच्या तहसील कार्यालयतील सूचना फलकावर दि.08 ऑक्टोबर 2025 रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

तरी सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, मतदार यादी संबंधीत तहसिलदार कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध असून मतदार यादीबाबत काही आक्षेप अगर हरकती असल्यास दि.08 ऑक्टोबर 2025 ते दि.14 ऑक्टोबर 2025 या कालावधीत कार्यालयीन वेळेत संबंधित तहसील कार्यालयात आक्षेप अगर हरकती नोंदविता येतील, असे उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) रुपाली भालके यांनी कळविले आहे.

# वसईत बंजारा समाजाचे आरक्षणासाठी आंदोलन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई :** महाराष्ट्रातील बंजारा समाजाला अनुसूचित जमातीच्या (ST) आरक्षणाच्या यादीत समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी वसई तालुक्यातील बंजारा समाजातर्फे मंगळवारी भव्य एल्गार मोर्चा काढण्यात आला. अखिल भारतीय बंजारा आरक्षण समितीतर्फे आयोजित या मोर्चात मोठ्या संख्येने आंदोलक सहभागी झाले होते. सध्या बंजारा समाज विमुक्त जाती प्रवर्गात समाविष्ट आहे, परंतु अनेक राज्यांमध्ये या समाजाचा समावेश अनुसूचित जमातीत (ST) करण्यात आलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील बंजारा समाजाला संविधानाच्या अनुच्छेद ३४२ (२) नुसार अनुसूचित जमातीच्या आरक्षण टक्केवारीत स्वतंत्रपणे समावेश करण्यात यावा या मागणीसाठी मंगळवारी वसईत सकल बंजारा समाजाकडून आंदोलन पुकारण्यात आले होते. यावेळी पारंपरिक पेहराव परिधान करत ७०० पेक्षा जास्त महिला, पुरुष आणि युवा आंदोलक या आंदोलनात सहभागी झाले होते. मंगळवारी सकाळी १० वाजता माणिकपूर मैदानातून या आंदोलनाची सुरुवात झाली. बंजारा आंदोलकांकडून माणिकपूर मैदानापासून वसईतील तहसीलदार कार्यालयापर्यंत रॅली काढण्यात आली. यावेळी मागण्यांसंदर्भातील निवेदनही नायब तहसीलदारांना सादर करण्यात आले. गेल्या अनेक वर्षांपासून बंजारा समाजाकडून अनुसूचित जमातीत समाविष्ट करून घेण्याची मागणी केली जात आहे. आम्हाला कुणाच्याही हक्काचे आरक्षण नको आहे. तर विमुक्त भटकी जमात प्रवर्गात जे तीन टक्के आरक्षण देण्यात आले आहे. तेवढंच आम्हाला अनुसूचित जमाती प्रवर्गातून हवं आहे, अशी प्रतिक्रिया आंदोलक रविकुमार राठोड यांनी दिली. अनुचित प्रकार घडू नये यासाठी कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# जीवनदीप महाविद्यालयात वादविवाद स्पर्धा संपन्न



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

जीवनदीप शैक्षणिक संस्था संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी, येथे दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता महाविद्यालयात "Debate – War of Words" ही वादविवाद स्पर्धा आयोजित करण्यात आली. ही स्पर्धा वाणिज्य विभागाच्या तर्फे घेण्यात आली होती. या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वक्तृत्वकला, आत्मविश्वास, तर्कशक्ती आणि संवाद कौशल्य वाढविणे हा होता.

स्पर्धेचे दोन गट करण्यात आले होते. गट १ – Shadow Pulse VS Fab Five आणि गट २ – We 6 VS Girly Gang. गट १ साठी वादविवादाचा विषय होता "Online Shopping vs Offline Shopping", तर गट २ साठी विषय होता "Social Media vs Real Life Communication". सर्व विद्यार्थ्यांनी या विषयांवर प्रभावी मते मांडत उत्कृष्ट सहभाग नोंदविला.

स्पर्धेच्या शेवटी गट १ मधून Fab Five आणि गट २ मधून Girly Gang या संघांनी विजेतेपद पटकावले.या कार्यक्रमात कॉमर्स विभागातील सर्व शिक्षकवर्ग उपस्थित होता आणि त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. रवींद्र घोडविंदे सर यांच्या मोलाच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य कैलास काळकटे सर यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला.



# अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त ठाणे महापालिकेत ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** अभिजात मराठी भाषा सप्ताहाच्या निमित्ताने ठाणे महानगरपालिकेतर्फे ग्रंथ प्रदर्शन आणि विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन बुधवार, ०८ ऑक्टोबर आणि गुरुवार, ०९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह, पहिला मजला, पालिका मुख्यालय, पाचपाखाडी येथे भरवण्यात येणार आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन बुधवार, ०८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या प्रदर्शनात साहित्य अकादमी, मॅजेस्टिक बुक डेपो, ज्योत्स्ना प्रकाशन, अनघा प्रकाशन, शारदा प्रकाशन आदींचे पुस्तक प्रदर्शन आणि विक्रीचे स्टॉल्स ठेवण्यात आले आहेत. प्रदर्शन सर्व नागरिकांसाठी खुले आहे.

ठाणे महापालिकेतर्फे 3 ऑक्टोबर पासून ९ ऑक्टोबर पर्यंत अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या सप्ताहाच्या काळात महापालिकेच्या शाळांमध्ये मराठी भाषेसंदर्भात प्रश्नमंजुषा, वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा, गद्य आणि पद्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जात आहेत. त्याबरोबर, शालेय स्तरावर पुस्तक प्रदर्शने, ग्रंथालय भेटी हेही कार्यक्रम होणार आहेत. महापालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी सोपी आणि सुटसुटीत कार्यालयीन मराठी या विषयावर डॉ. धनश्री लेले यांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. तरी नागरिकांनी या ग्रंथप्रदर्शनास भेट द्यावी असे आवाहन माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त उमेश बिरारी यांनी केले आहे.

# मराठवाडा पूरग्रस्तांसाठी मदतीला सरसावले माय मराठी प्रतिष्ठान



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पश्चिम येथील माय मराठी प्रतिष्ठान,योगीधाम हि संस्था समाजोपययोगी कार्यात सतत कार्यरत असते. संस्थेच्यावतीने मराठी लोकांचे हक्कासाठी तसेच मराठी भाषेचे जतन होण्याचे दृष्टीने विविध उपक्रम, कार्यक्रम राबविले जातात.

महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाडा भागात देखील नैसर्गिक आपत्ती ओढवली. मराठी प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सभासद यांनी आपले सामाजिक दायित्व समजून पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी खारीचा वाटा म्हणून मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या नावे रु.३१००० (एकतीस हजार)रकमेचा धनादेश तहसीलदार सचिन शेजाळ म यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष नितीन जाधव, सचिव अतुल सरगर, खजिनदार जितेंद्र सावंत, अनिल जगताप, विनोद वीरकर आदी पदाधीकारी उपस्थित होते.

# खाजगी लेखा परिक्षक पदासाठी इच्छूकांनी अर्ज करावेत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** रायगड जिल्हा पोलीस कल्याण निधी अंतर्गत घटक पोलीस कल्याण निधी रायगड व त्याअंतर्गत चालणारे उपक्रम (पोलीस कॅन्टीन, वेल्फेअर पेट्रोलपंप) यांची वार्षिक तपासणी करण्याच्या अनुषंगाने चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांची नेमणूक करावयाचे प्रयोजन असून जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून इच्छूक खाजगी चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांचे अर्ज मागविण्यात आले आहेत. इच्छूक खाजगी चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परिक्षक) यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण शाखा, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्याकडे अर्ज करावेत, असे प्रमुख लिपिक, पत्रव्यवहार शाखा अति.कार्य. कार्यालय अधीक्षक दिपिका पाटील यांनी कळविले आहे.

# टँकरची दुचाकीला धडक

## अपघातात पत्नीचा मृत्यू तर पती गंभीर जखमी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** सोमवारी ६ ऑक्टोबर रोजी दुपारी १.२० वाजण्याच्या सुमारास वडखळ परिसरातील खारपाले ब्रिजवर झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा मृत्यू झाला असून तिचा पती गंभीर जखमी झाला आहे. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

खारकलाई, पो. आमटेम, ता. पेण येथील गंगाराम परशुराम नाईक (वय ५२) व त्यांची पत्नी संगिता गंगाराम नाईक (वय ४९) हे दोघे आपल्या ॲक्टीवा (क्र. MH06/ BT2631) वरून मुंबई-गोवा महामार्गाने वडखळ बाजूने आमटेम येथे परत येत असताना, मागून येणाऱ्या टँकर (क्र.MH49 /BU7039) ने जोरदार धडक दिली. या अपघातात संगिता नाईक यांचा जागीच मृत्यू झाला तर गंगाराम नाईक गंभीर जखमी झाले.सदर प्रकरणी वडखळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी चालक मोहम्मद सलमान इसराक अहमद (वय २५, रा. भैरवा, चंदनपुर, महाराजगंज, उत्तरप्रदेश) याला अटक करण्यात आली आहे. पोलिस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास सहा. फौजदार महेश मधुकर ठाकूर करीत आहेत.






# नाव न बदलल्यास हिंदू समाज चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही !

## - हिंदु जनजागृती समितीचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राष्ट्रसंत श्री समर्थ रामदास स्वामी महाराज यांनी रचलेल्या 'मनाचे श्लोक' या पवित्र धार्मिक ग्रंथाच्या नावाचा वापर करून त्याच नावाने मराठी चित्रपटाची निर्मिती करणे, हा हिंदूंच्या श्रद्धेचा बाजार मांडण्यासारखे आहे. हा समर्थ रामदासस्वामींचा अपमानच आहे. उच्चतम नैतिक मूल्ये शिकवणाऱ्या ग्रंथाचे नाव केवळ मनोरंजन, व्यावसायिक लाभ आणि सवंग प्रसिद्धीसाठी वापरणे, हा कोट्यवधी श्रीरामभक्तांच्या आणि समर्थभक्तांच्या धार्मिक भावना पायदळी तुडवण्याचा प्रकार आहे. संतपरंपरेचा हा अपमान हिंदू समाज कदापि सहन करणार नाही. जर या चित्रपटाचे नाव तात्काळ बदलले नाही, तर हिंदू समाज रस्त्यावर उतरून आंदोलन करेल आणि चित्रपट प्रदर्शित होऊ देणार नाही. शासन आणि सेन्सॉर बोर्डाने याची तातडीने गंभीर दखल घेऊन "मनाचे श्लोक" हे पवित्र नाव चित्रपटाच्या शीर्षकातून हटवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी केली आहे.

श्री. सुनील घनवट पुढे म्हणाले की, "या संदर्भात समितीच्या वतीने शासन व सेन्सॉर बोर्डाला निवेदन देण्यात येणार असून, संबंधितांना कायदेशीर नोटीसही पाठवली जाईल. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली कोणी कुराण किंवा बायबल यांसारख्या धार्मिक ग्रंथांची नावे वापरून चित्रपट बनवण्याचे धाडस करेल का? आणि जरी केले, तरी सेन्सॉर बोर्ड त्याला परवानगी देईल का? मग केवळ हिंदूंच्याच धार्मिक भावना वारंवार का दुखावल्या जातात? यापूर्वी 'द डा विंची कोड' आणि 'विश्वरूपम' यांसारख्या चित्रपटांमुळे अनुक्रमे ख्रिस्ती व मुस्लिम धर्मीयांच्या भावना दुखावल्याने अनेक राज्यांत त्यांच्या प्रदर्शनावर बंदी घालण्यात आली होती. या चित्रपटाच्या बाबतीतही कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी चित्रपट निर्माते, दिग्दर्शक आणि सेन्सॉर बोर्ड जबाबदार असतील."

श्री. घनवट पुढे म्हणाले, "सर्वोच्च न्यायालयाने लाल बाबू प्रियदर्शी विरुद्ध अमृतपाल सिंग [(2015) 16 SCC 795] या खटल्यात स्पष्ट केले आहे की, 'रामायण'सारख्या पवित्र ग्रंथांच्या नावांचा वापर व्यावसायिक फायद्यासाठी मक्तेदारी म्हणून करता येत नाही. या तत्त्वानुसार 'मनाचे श्लोक' हे नाव चित्रपटासाठी वापरणे कायद्याच्या आणि नैतिकतेच्या विरोधात आहे. भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २९९ नुसार हेतुपुरस्सर धार्मिक भावना दुखावणे हा एक गंभीर, दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा आहे; तसेच सिनेमॅटोग्राफ कायदा १९५२च्या कलम ५-ब नुसार सामाजिक सलोखा आणि नैतिकता धोक्यात आणणाऱ्या कोणत्याही चित्रपटाला प्रमाणपत्र न देण्याची जबाबदारी सेन्सॉर बोर्डाची आहे."

शेवटी श्री. घनवट यांनी म्हटले की, 'मनाचे श्लोक' हे शीर्षक चित्रपटातून त्वरित आणि बिनशर्त मागे घ्यावे. केंद्र आणि राज्य शासनाने भविष्यात अशा प्रकारे धार्मिक प्रतीकांचा गैरवापर रोखण्यासाठी कठोर कायदा करावा.

# आ.सुलभा गायकवाड यांच्याकडून रस्त्याच्या कामांची पाहणी

## लवकरच कल्याण पूर्वेतील रस्ते खड्डेमुक्त होणार



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील रस्त्यांची झालेली दयनीय अवस्था लक्षात घेऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्याकडे कल्याण पूर्वच्या आमदार सुलभा गायकवाड यांनी वारंवार पत्रव्यवहार करून, सतत पाठपुरावा करत मागणी केली होती. प्रशासनाने केलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. आमदारांच्या पाठपुराव्या नुसार कल्याण पूर्वेतील रस्त्यांच्या कामांना सुरवात झाली असून या कामांची पाहणी आमदार सुलभा गायकवाड यांनी केली.

श्री मलंग रोड, तसेच इतरही अनेक भागात रस्ते दुरुस्तीच्या कामांना सुरुवात झाली असून, चिंचपाडा, यू टाईप व नांदिवली येथेही लवकरच कामे सुरू होणार आहेत. त्यामुळे कल्याण पूर्व विधासभा क्षेत्रातील सर्वच रस्ते लवकरच खड्डेमुक्त होतील. प्रशासनाने जनतेच्या हिताच्या कामांकडे वेळेवर लक्ष देणे हीच खरी प्रशासनाची जबाबदारी आहे, हे त्यांनी लक्षात ठेवावे. एक लोकप्रतिनिधी म्हणून वारंवार याचा पाठपुरावा केला आहे आणि या पुढेही करत राहणार. सर्व सामान्यांना न्याय मिळवून देणे हे कर्तव्य असून ते प्रामाणिकपणे करत राहीन अशी प्रतिक्रिया यावेळी आमदार सुलभा गायकवाड यांनी दिली.

# तालुकास्तरीय स्पर्धेत कमलताई किसन कथोरे महाविद्यालयाचे यश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** दि. ०३ ऑक्टोबर, २०२५ रोजी सर्वोदय विद्यालय कुडवली येथे झालेल्या कबड्डी स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयातील मुलींनी (१९ वर्षे खालील गट) प्रथम क्रमांक मिळविला. तसेच त्यांची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली.

तसेच दि. ०४ ऑक्टोबर, २०२५ रोजी महाराष्ट्र मिलिटरी स्कूल तळवली (बा), ता. मुरबाड येथे झालेल्या तालुका स्तरीय स्पर्धेत (वयोगट:- 17/19 वर्षाखालील मुले/मुली) आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन त्यात विजयी होऊन जिल्हास्तरीय मैदानी (Athletics) स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. त्यांची नावे पुढील प्रमाणे...

1) कल्याणी तुकाराम आगिवले
1500 mtr -1st
under - 17

2) स्नेहा शरद एगडे
1500 mtr -1st
Under -19

3) मोहन कृष्णा हिंदोळा
लांब उडी 1st
Under - 19

4) प्रीती प्रकाश कोंगेरे
लांब उडी 1st
Under -19

5) रक्षा अंकुश म्हात्रे
लांब उडी 2nd
under - 19

6) प्राची रमेश देसले
भाला फेक 1st
under -17

7) रेखा नारायण कंटे
भाला फेक 1st
Under - 19

8) चैतन्य गवाळे
गोळा फेक 1st
Under -17

9) चैतन्य गवाळे
थाली फेक 1st
Under -17

10) चेतन पांडुरंग पुंजारा
उंच उडी 1st
Under -19

या प्रसंगी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅडम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी व क्रीडा प्रशिक्षक प्रा. दिनेश शेळके यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आरोग्याची काळजी घेतली तर हृदयविकारापासून दुर राहू शकतो - डॉ. विशाल पिंगळे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**भिवंडी :** सुरू असलेल्या स्पर्धेच्या युगात व्यवसाय, नोकरी, प्रवास अभ्यास अशा विविध कारणांमुळे आपल्या शाररिक आजार नकळत जडत असतात त्यामुळे वरिष्ठ नागरिकां बरोबर, गृहिणी,विद्यार्थी वर्गाला देखील मानसिक ताण-तणाव सामोरे जावे लागत आहे.बदलती जीवनशैली व बदलती आहाराची पद्धतीचा परिणाम मनुष्य जीवनावर होत आहे.त्यामुळे भारतात हृदयविकार रुग्णांच्या संख्येत देखील वाढ होत आहे.त्यामुळे तज्ञ डॉक्टरांकडून वेळच्यावेळी आरोग्याची तपासणी करून घेतली तर हृदयविकाराच्या आजारापासुन दुर राहू शकतो त्यासाठी आरोग्याची काळजी घ्या असे आवाहन हृदयरोग तज्ञ डॉ.विशाल पिंगळे यांनी भिवंडीत झालेल्या कार्यक्रमात केले आहे.

भिवंडी शहरातील ब्राह्मण आळी येथील वाचन मंदिराच्या वतीने आयोजित शारदीय प्रबोधन मालाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळेला हृदयविकार समज व गैरसमज या विषयावर टिळक मंदिर सभागृहात आयोजित केलेल्या कार्यक्रमात डॉ.पिंगळे बोलत होते.यावेळी वाचन मंदिराचे अध्यक्ष सुधीर सिंगासने, उज्वल कुंभार,नंदकिशोर पिंगळे, अनिल वडके, अजित कलंत्री,नाना वगळ,मोहन पिंगळे,पंढरीनाथ कुंभार,अँड.मनिष कानिटकर,ज्ञानेश्वर गोसावी व मान्यवर उपस्थित होते. हृद्यविकाराची लक्षणे जाणून जाणून घ्या या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका.छातीत व डाव्या खांद्याचा दुखणे,तसेच उच्च रक्तदाब,मधुमेह याकडे लक्ष वेळच्यावेळी लक्ष देत तज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचे मत डॉ. पिंगळे यांनी यावेळी व्यक्त केले.नियमित थोडा व्यायाम, आहाराची पथ्य पाळणे आवश्यक आहे. चालण्याचा व्यायामया मुळे हृदयविकारापासून आपण दूर राहू शकतो असे डॉ. पिंगळे यांनी सांगितले.यावेळी उपस्थित नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांना सुध्दा डॉक्टरांनी उत्तरे दिली.

कार्यक्रम प्रास्ताविक वाचन मंदिर संस्थेचे सहकार्यवाह मिलिंद पळसुले तर किशोर नागरकर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल प्रणाली खोडे, शलाका मदन, शितल ताले,शैला परब यांनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शहरातील मान्यवर नागरिक उपस्थित होते.






# ठाणे महानगरपालिकेत महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात महर्षी वाल्मिकी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महर्षी वाल्मिकी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करताना अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, उपायुक्त मनीष जोशी, जी.जी. गोदेपुरे, सचिन सांगळे, कार्मिक अधिकारी दयानंद गुंडप, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी व समाज बांधव उपस्थित होते.

# पडघ्यातील टी. ए. पाटील शाळेतील विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत उत्तुंग भरारी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



**पडघा :** भिवंडी तालुक्यातील भवाळे येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत पडघा येथील टी. ए. पाटील इंग्लिश मिडीयम शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवत उत्तुंग भरारी घेतली आहे.

भिवंडी तालुक्यातील शालेय, शासकीय, मैदानी तालुका क्रीडा स्पर्धा तालुक्यातील ऑल सेंट हायस्कूल भावाळे येथे घेण्यात आली.यावेळी टी. ए. पाटील इंग्रजी मिडियम मधील१४ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांनी लक्षवेधी यश संपादन केले त्यात कु. हर्ष सोमनाथ पाटील याने लांब उडी, शंभर मीटर हडळ रन मध्ये प्रथम, कु.अद्वेत अमोल जाधव याने शंभर मीटर रनिंग मध्ये प्रथम तर कु.मनस्वी किरण गवाले हिने लांब उडी मध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे.या तिन्ही विद्यार्थ्यांनी तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धेत चांगले यश मिळवले असून त्यांची जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत निवड करण्यात आली आहे. यावेळी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षिका नीता वारघडे यांनी मार्गदर्शन केले. तसेच त्याच्या पुढील वाटचालीसाठी संस्थेचे अध्यक्ष कुंदन पाटील उपाध्यक्ष शंशाक तांबोळी खजिनदार यशवंत गायकवाड, संचालक मंडळ, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका ,शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विद्यार्थीचें अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.अतिशय मेहनत, चिकाटी व प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली या विद्यार्थ्यांनीं यश संपादन केले असून त्यांच्यावर सर्वच स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# उद्या ठाण्यात पाणीबाणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जांभूळ जलशुद्धीकरण केंद्रातील जलाशय येथे बारवी गुरूत्व वाहिनी क्र. 1,2 व 3 वर जलवाहिन्यांचे उन्नतीकरण व तातडीने देखभालीचे काम करण्यात येणार आहे, यासाठी गुरूवार दिनांक 09/10/2025 रोजी रात्री 12.00 वाजेपर्यत ते शुक्रवार दिनांक 10/10/2025 रोजी रात्री 12.00 वाजेपर्यंत एकूण 24 तास पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

परिणामी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या ठाणे महानगरपालिकेअंतर्गत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. 26 व 31 चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समितीमधील सर्व भागामध्ये व वागळे प्रभाग समिती मधील रुपादेवी पाडा,किसननगर नं. 2, नेहरूनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणी पुरवठा दिनांक 09/10/2025 रोजी रात्री 12.00 वाजेपर्यंत ते दिनांक 10/10/2025 रोजी रात्री 12.00 वाजेपर्यंत एकूण 24 तासांसाठी पूर्णपणे बंद राहील. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील 1 ते 2 दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची नोंद नागरिकांनी घ्यावी. पाणी कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे करण्यात आले आहे.


*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*